जा.क्र. ब/लागवड/2कोटी/16-17/70
देवरूख दिनांक : 22-08-2016

प्रति,

प्राचार्य,
राजेंद्र माने तंत्रनिकेतन,
आंबव.

विषय :- वृक्षलागवड कार्यक्रमामध्ये उत्स्फुर्त सहभागाबद्दल...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य शासनाच्या सन 2016 मधील दिनांक 1 जुलै ते 7 जुलै 2016 या वनमहोत्सव कालावधीत दिनांक 1 जुलै 2016 या दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्ष लागवड करण्याच्या महत्वाकांक्षी अभियानामध्ये संस्थाध्यक्ष मा. रविंद्र माने, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व सुमारे 200 विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेऊन वृक्ष लागवडीचे महत्वाकांक्षी अभियान यशस्वी होण्यासाठी मोलाचा हातभार लावला त्याबद्दल धन्यावाद.

आपला विश्वासू

लागवड अधिकारी
सामाजिक वनीकरण देवरूख

लागवड अधिकारी
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,
देवरुख

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

विभागीय कार्यालय, मुंबई.

(Autonomous) (ISO 9001-2008)

शासकीय तंत्र निकेतन इमारत, दुसरा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दूरध्वनी क्रमांक – २६४७३२५३ फॅक्स – ९१-०२२-२६४७३२५४

Email – rbtemumbai@msbte.com Web – www.msbte.com

क्र.मरातंशिमं/विकामुं/लले/2016/176/ दिनांक : 29.06.2016

प्रति,
प्राचार्य,
विभागीय कार्यालय,मुंबई यांच्या अखत्यारीतील,
सर्व AICTE/ NON-AICTE संस्था.

विषय :- सन 2016 मधील पावसाळ्यात दि.1जुलै ते 7 जुलै 2016 या वनमोहत्सव कालावधीत 1 जुलै 2016 रोजी ह्या एकाच दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्ष लागवडीबाबत.

संदर्भ :- शासन आदेश क्र.संकीर्ण-2016/प्र.क्र.76/16/आस्था-2,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई. दि.20.05.2016

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, सन 2016 मधील पावसाळ्यात दि.1जुलै ते 7 जुलै 2016 या वनमोहत्सव कालावधीत दि. 1 जुलै 2016 रोजी ह्या एकाच दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय यांनी आदेश वरील संदर्भाकींत पत्रान्वये दिलेले आहेत. त्या अनुषंगाने आपण आपल्या संस्थेत व संस्थेच्या परिसरात या दिवशी प्रती संस्था किमान 100 झाडे लाववीत व वृक्षारोपणाचा हा कार्यक्रम यशस्वी करावा. तसेच या कार्यक्रमाची छायाचित्रे या कार्यालयास त्वरीत दि.01.07.2016 रोजी ई-मेल द्वारे सादर करावीत.

तसेच उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे केलेल्या वृक्षारोपणाचा अनुपालन अहवाल (छायाचित्रासहित) या कार्यालयास दि.05.07.2016 पूर्वी सादर करावा.

Prof. DKK/ Shri. RKA (Lib)
Pl. prepare a draft brief guideline of program, showing photograph, attendance of student & news paper advt. in this regard.
01.07.16

(व्ही.डी.वैद्य)
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,मुंबई

प्रत :- मा.सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना माहितीकरिता सविनय सादर.

PRABODHAN SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S (Reg. No.E-697 Ratnagiri)
RAJENDRA MANE POLYTECHNIC
Approved by AICTE New Delhi, Recognised by D.T.E. Govt. of Maharashtra State & Affiliated to MSBTE
At & Po. Ambav (Devrukh), Tal. Sangmeshwar, Dist. Ratnagiri, Pin - 415804 (Maharashtra)
Tel.No. (02354) 269454 / 269477 Fax No. (02354) 269464

# राजेंद्र माने तंत्रनिकेतन, आंबव महाविद्यालयाचा वनमोहत्सव वृक्ष लागवड कार्यक्रमात उत्स्फुर्त सहभाग

महाराष्ट्र राज्य शासनाच्या सन २०१६ मधील दिनांक दि. १ जुलै ते ७ जुलै २०१६ या वनमोहत्सव कालावधीत दिनांक १ जुलै २०१६ या दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याच्या महात्वाकांक्षी अभियानामध्ये संस्थाध्यक्ष मा. रविंद्र माने, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. एस.व्ही. पाटील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.

सकाळी १० वाजता संस्था परिसरामध्ये संस्थाध्यक्ष मा. रविंद्र माने यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा मुहुर्त करुन वेगवेगळ्या प्रकारची १०० झाडांची लागवड करणेत आली.

लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण, देवरुख यांच्या कार्यालयाकडून वृक्षलागवड अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा सहभाग मिळण्यासाठी तंत्रनिकेतला आलेल्या पत्रावरुन वाशी फाटा ते आंबव कॉलेज स्टॉप पर्यंत सुमारे ३०० वृक्ष लागवड करण्यासाठी तंत्रनिकेतन स्टाफ व २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेवुन २ कोटी वृक्ष लागवड करण्याचे महात्वाकांक्षी अभियान यशस्वी करण्यासाठी हातभार लावला. सदर कार्यक्रम संस्थाध्यक्ष रविंद्र माने , समाजिक वनिकरण लागवड अधिकारी एस. के गिरकर, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला.

वरील बातमी प्रहार, रत्नागिरी टाईम्स, सकाळ या दैनिक वर्तमान पत्रात दिली आहे.

RAJENDRA MANE POLYTECHNIC PSPS AMBAV-DEVRUKH

02.07.16
Dr. S. V. Patil
Principal
Rajendra Mane Polytechnic
Ambav - Devrukh,
Tal.Sangameshwar,Dist.Ratnagiri
Pin : 415 804 (Maharashtra)

# लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण देवरूख यांचे कार्यालय

विषयः– 2 कोटी वृक्ष लागवड करण्यासाठी विदयार्थी उपलब्ध घेणे बाबत..
जा.क/ब/सावदे/2कोटीवृला/16–17/40
देवरूख दिनांक : 16/06/2016

प्रति,

मा. प्राचार्य,
राजेंद्र माने पॉलीटेक्निक कॉलेज,
आंबव

संदर्भः– मा. मंत्री महोदय, श्री. सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वित्त आणि नियोजन व वने महाराष्ट्र राज्य यांची 2 कोटी वृक्ष लागवडीचे संदर्भातील आवाहन

उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्रात 1 जूलै 2016 रोजी एकाच दिवशी 2 कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प राज्य सरकारने घेतला आहे. महाराष्ट्रातील वनाच्छादन 33 टक्के वाढविण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेउन महत्वाकांक्षी पाउल उचलले आहे.

हा उपक्रम केवळ शासकीय उपक्रम किंवा कार्यक्रम राहू नये याची दक्षता घेणे गरजेचे आहे. पावसाशी वृक्षांचा जवळचा संबंध आहे. वाढत्या जागतिक तापमानाचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र बनत आहे. हे लक्षात घेउन <u>2 कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम एक अभियान</u> म्हणून हाती घेतला आहे. या अभियानावर शासनाचे सर्व विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उदयोग समूह, स्वयंसेवी, सामाजिक संस्था, मान्यवर व्यक्ती सहभागी होणार आहेत. हे अभियान यशस्वी होण्यासाठी मनुष्यबळाची उपलब्धतता निश्चित व अचूक नियोजन करावयाचे आहे या अनुषंगाने शाळा, महाविदयालये, यांनी वृक्षलागवड अभियानात सहभागी होउन सदर महत्वाकांक्षी कार्यकामास यशस्वी करण्यासाठी आपले महाविदयालयातील विदयार्थ्यांना सहभागी करून वृक्ष लागवडीच्या कामास सहकार्य करावे हि विनंती.

दिनांकः– 1 जूलै 2016
वेळः– सकाळी 8.00 ते 12.00
स्थळः– कर्ली फाटा ते आंबव कॉलेज रस्ता दुर्तफा परिसर वृक्ष लागवड

सचिव
तालूका नियोजन, समन्वय अंमलबजावणी आणि सनियंत्रण समिती.
तथा
लागवड अधिकारी
सामाजिक वनीकरण परिक्षेत्र
देवरूख

अध्यक्ष
तालूका नियोजन, समन्वय अंमलबजावणी आणि सनियंत्रण समिती.
तथा
उपविभागीय अधिकारी संगमेश्वर/रत्नागिरी

SSC
Pl. display on student notice board & inform to all HOD's for Max participation of students.
[illegible]/22.06.16

# RAJENDRA MANE POLYTECHNIC, AMBAV (DEVRUKH)

## TREE PLANTATTION 1ST JULY 2016













दैनिक सकाळ दि० 09/07/2016



आंबव येथील राजेंद्र माने तंत्रनिकेतन महाविद्यालयात वृक्षारोपन करताना.

# माने महाविद्यालयात वृक्षारोपण

देवरूख, ता. ८ : महाराष्ट्र राज्य शासनाच्या दोन कोटी वृक्षलागवडीच्या मोहिमेत आंबव येथील राजेंद्र माने तंत्रनिकेतन महाविद्यालयात संस्थाध्यक्ष रवींद्र माने, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

श्री. माने यांच्या हस्ते वृक्षलागवडीचा प्रारंभ करून १०० प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. वाशी फाटा ते आंबव कॉलेज स्टॉपपर्यंत सुमारे ३०० वृक्षलागवड करण्यात आली. यामध्ये तंत्रनिकेतनचे कर्मचारी व सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्यासाठी हातभार लावला.



आंबव येथील राजेंद्र माने तंत्रनिकेतन महाविद्यालयात वृक्षारोपन करताना.

# माने महाविद्यालयात वृक्षारोपण

देवरूख, ता. ८ : महाराष्ट्र राज्य शासनाच्या दोन कोटी वृक्षलागवडीच्या मोहिमेत आंबव येथील राजेंद्र माने तंत्रनिकेतन महाविद्यालयात संस्थाध्यक्ष रवींद्र माने, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. एस. व्ही. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

श्री. माने यांच्या हस्ते वृक्षलागवडीचा प्रारंभ करून १०० प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. वाशी फाटा ते आंबव कॉलेज स्टॉपपर्यंत सुमारे ३०० वृक्षलागवड करण्यात आली. यामध्ये तंत्रनिकेतनचे कर्मचारी व सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अभियान यशस्वी करण्यासाठी हातभार लावला.